**आकाशवाणी नागपूर,**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
**शुक्रवार दिनांक १० ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **आपल्या हक्कांसाठी एकजुटीने उभं राहणं ही काळाची गरज असल्याचं नेते विजय वडेट्टीवार यांचं प्रतिपादन / सकल ओबीसी समाजाच्या मोर्चात जमले हजारो नागरिक.**
2. **नागपुरात जागतिक दर्जाचं 'कन्व्हेन्शन सेंटर' उभारण्यासाठी स्पेनच्या कंपनीसोबत राज्य सरकारचा सामंजस्य करार.**
3. **तंत्रज्ञानाचा उपयोग करून पर्यावरण पूरक आणि शाश्वत बांधकाम करण्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं आवाहन.**
4. **२०२५चा शांततेचा नोबेल पुरस्कार व्हेनेझुएलाच्या मारिया कोरीना मच्याडो यांना जाहीर.**

**आता सविस्तर बातम्या .......**

सकल ओबीसी मोर्चा

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यासंदर्भात २ सप्टेंबर रोजी राज्य सरकारने काढलेला आदेश रद्द करावा, या मागणीसाठी नागपुरात आज सकल ओबीसी समाजाच्या वतीने मोर्चा काढण्यात आला. यशवंत स्टेडियम येथून सुरुवात झालेल्या या मोर्चाचं संविधान चौकात जाहीर सभेत रूपांतर झालं. या मोर्चात विदर्भाच्या काना कोपऱ्यातून मोठ्या संख्येने ओबीसी संघटना, आणि नागरिक सहभागी झाले होते. सभेला संबोधित करताना- हा मोर्चा म्हणजे केवळ आंदोलन नाही तर हा जनतेच्या भावनांचा उद्रेक आहे. ओबीसी समाजावर झालेल्या या अन्यायाविरोधात एकजुटीने उभं राहणं ही काळाची गरज आहे, असं कांग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार म्हणाले....

***ज्या लोकांनी उत्स्फुरतेपणे हा मोर्चा काढला आहे तिथे कुठलाही पक्ष नाही ,तिथे कुठलाही राजकीय विषय नाही. फक्त एकच विषय जो काळा जीआर आहे तो रद्द करा एवढीच मागणी आहे.***

मराठा समाजाच्या व्यक्तींना खोटे कुणबी दाखले देणे बंद करावे, आतापर्यंत मराठा समाजाला देण्यात आलेल्या कुणबी जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणीबाबत श्वेतपत्रिका काढण्यात यावी, महाजोती संस्थेला लोकसंख्येच्या प्रमाणात **1000** कोटी रुपयांचा निधी द्यावा आदी नऊ मागण्यांचं निवेदन सकल ओबीसी महामोर्चातर्फे मुख्यमंत्र्यांना पाठवण्यात आलं आहे.

कन्व्हेन्शन सेंटर

सांस्कृतिक कार्यक्रमांना हक्काचं व्यासपीठ मिळावं याकरीता नागपुरात सर्व सोयी सुविधायुक्त जागतिक दर्जाचे कन्व्हेन्शन सेंटर उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी स्पेन मधल्या फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसमवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज सामंजस्य करार करण्यात आला. नागपूरमध्ये उभारण्यात येणाऱ्या कन्व्हेन्शन सेंटरसाठी निवडण्यात येणारी जागा सर्व परिवहन सेवांनी उत्तमरित्या जोडलेली असावी, अशी सूचना फडणवीस यांनी केली. नागपूरचा इतिहास कन्व्हेन्शन सेंटरला भेट देणाऱ्या प्रत्येकाला समजावा, अशा पद्धतीने कन्व्हेन्शन सेंटरची अंतर्गत रचना असावी, असं ते म्हणाले.

प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजना

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या शनिवारी नवी दिल्लीत प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजनेचा शुभारंभ करणार आहेत. राज्यामध्ये केंद्र आणि राज्य शासनाद्वारे कार्यान्वित असलेल्या ३६हून अधिक योजना राबवून पिकांची उत्पादकता वाढवणं, पीक उत्पादनाची शाश्वतता सुनिश्चित करणं, तसंच काढणी पश्चात तंत्रज्ञान आणि पतपुरवठा प्रणाली मजबूत करण्याच्या उद्देशानं देशातल्या १०० आकांक्षित जिल्ह्यांमध्ये ही योजना राबवण्यात येणार आहे. यामध्ये विदर्भातल्या यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, या जिल्ह्यांची निवड झाली आहे. डाळी क्षेत्रात आत्मनिर्भरतेसाठीच्या अभियानाचा शुभारंभ देखील पंतप्रधानांच्या हस्ते यावेळी करण्यात येणार आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

बांधकाम क्षेत्रातील व्यावहारिक समस्या समजून, घेऊन पर्यायी बांधकाम सामग्रीच्या साह्याने खर्च कमी करून, तसंच बांधकाम गुणवत्तेशी कुठलीही तडजोड न करता अभियंता तसेच हितधारकांनी पर्यावरण पूरक आणि शाश्वत असं बांधकाम करावं असं आवाहन केंद्रीय मंत्री

नितीन गडकरी यांनी केलं. नागपुरात उत्तर अंबाझरी रस्त्यावरील इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्सच्या परिसरात 'फॉरेन्सिक सिविल इंजीनियरिंग' या विषयावरील दोन दिवसीय अखिल भारतीय चर्चासत्राचं उद्घाटन आज गडकरींच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स एम.एस.ईचे अध्यक्ष ए.डब्ल्यू जवंजाळ तसेच राष्ट्रीय अध्यक्ष मनीष कोठारी उपस्थित होते. प्रत्येक जिल्ह्यात प्री कास्ट टेक्नॉलॉजीचा वापर झाल्यास ते उद्योगाला फायदेशीर ठरेल. बांबूचे क्रॅश बॅरियर्स आणि बायो बिटुमीनचा उपयोग पर्यावरण पूरक आणि शाश्वत असल्याचं प्रतिपादन गडकरी यांनी केलं....

***अभी हमने बांबू के क्रैश बैरियर भी बनाया है और बहुत अच्छे बने है अभी आप यहाँ बूटीबोरी के आगे जाम के तरफ जाओगे तो वहाँ भी वणी -वरोरा पे भी है इकोलॉजी एंड एनवायरनमेंट को प्रोटेक्ट करने के लिए भी अभी काफी बातों का उपाय करना चाहिए अभी हमने जो बायो बिटुमिन जो बनाया है राइस स्ट्रॉ से जो सीएनजी बनाकर जो इंधन निकलता है, उससे जो बिटुमिन निकलता है वो बिटुमिन में डाल कर अभी यह रामटेक रोड पर मन्सर से कन्हान तक एक किलोमीटर रोड बायो बिटुमिन का बना है ।***

याप्रसंगी गडकरी यांना इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्सच्या वतीने फेलोशिप प्रदान करण्यात आली.

महाराष्ट्र ऑलिम्पिक

महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेची निवडणूक दोन नोव्हेंबर रोजी पुण्यात होणार आहे. संघटनेचे विद्यमान अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेचे अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अध्यक्ष पदासाठी अर्ज भरला आहे. २०१३ पासून सलग तीन वेळा अजित पवार अध्यक्ष पदावर आहेत.

शांततेचा नोबेल

२०२५ चा शांततेचा नोबेल पुरस्कार व्हेनेझुएलाच्या मारिया कोरीना मच्याडो यांना जाहीर झाला आहे. व्हेनेझुएलामध्ये नागरिकांच्या लोकशाही हक्कांचं रक्षण आणि हुकुमशाहीपासून लोकशाहीकडे देशाची वाटचाल शांततेत व्हावी, यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल हा पुरस्कार दिल्याची घोषणा नॉर्वेच्या नोबेल समितीनं केली आहे.

मानसिक आरोग्य दिवस

आज जागतिक मानसिक आरोग्य दिवस पाळण्यात येत आहे. मानसिक आरोग्यासंबंधी जागरुकता वाढवणं आणि मानसिक आरोग्य सेवांना गती देणं, हे या दिनाचं उद्दीष्ट आहे. आपल्याला आपल्या मानसिक आणि भावनिक आरोग्याला प्राथमिकता दिली पाहिजे, याची आठवण हा दिवस करुन देतो, असं केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. यंदाची संकल्पना, 'आपत्ती आणि आपत्कालिन परिस्थितीत मानसिक आरोग्य अबाधित राखण्यासाठी आरोग्य सेवांची उपलब्धता', अशी असून, आपत्कालिन परिस्थितीत मानसिक आधार उपलब्ध करुन देण्याच्या गरजेवर प्रकाश टाकत असल्याचं नड्डा म्हणाले. नागपूरचे बाल मानसोपचार तज्ञ डॉ.अमरजीत वाघ याविषयी आकाशवाणीशी बोलताना म्हणाले-

***जस आपण लहान मुलांच्या शारीरिक आरोग्याकडे लक्ष देतो तसंच त्यांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष देणं पण खूप गरजेचं झालं आहे. लहान मुलांना आज इंटरनेट खूप सहजासहजी अॅवेलेबल व्हायला लागला आहेत. काही गोष्टी ज्या त्यांच्या वयासाठी व्यवस्थित नाहीत, आपण गोष्टी त्यांच्यापर्यंत पोहचत आहे आणि या गोष्टी कधी कधी त्यांच्यामध्ये नैराश्य हायपरअॅक्टिविटी असे लक्षणांतर त्यामुळेआई वडिलांनी नेहमी लहान मुलांशी सुसंवाद साधणे, त्यांचे मित्र परिवार माहित असणे, त्यांच्याशी रेग्युलर बोलत राहणे आणि त्यांचे प्रॉब्लेम समजून घेणे हे खूप गरजेचे झाले आहे.***

'ट्रेड प्रमाणपत्र'

राज्यभरातील अनधिकृत वाहन विक्रेत्यांना वाहन पुरवणाऱ्या अधिकृत विक्रेत्यांचे 'व्यापार प्रमाणपत्र' रद्द करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिवहन आयुक्तांना दिले आहेत. हे आदेश ऑटोमोबाईल डीलर्स फेडरेशनच्या बैठकीत देण्यात आले. राज्यात अनधिकृत वाहन विक्रेत्यांची मोठी साखळी कार्यरत असून त्याद्वारे महसूल न देता वाहन विक्री करण्यात येते, त्यामुळे भविष्यात अशा विक्रेत्यांना वाहन पुरवणाऱ्या अधिकृत विक्रेत्यांचे ट्रेड प्रमाणपत्र रद्द केले जाईल, असं सरनाईक यांनी सांगितलं.

आंतरराष्ट्रीय तांदूळ परिषद

भारत आंतरराष्ट्रीय तांदूळ परिषद २०२५ दिनांक ३० आणि ३१ ऑक्टोबरला नवी दिल्लीत भारत मंडपम इथं होणार आहे. या परिषदेत सुमारे **१५०** तांदूळ उत्पादक सहभागी होणार असून त्यात तांदूळ उत्पादनाशी संबंधित विविध नवकल्पना, तंत्रज्ञान आणि प्रीमियम तांदळाच्या विविध जाती सादर केल्या जातील. जागतिक तांदूळ उद्योगाच्या इतिहासातली ही सर्वात मोठी परिषद असून यात ८० हून अधिक देशांतले एक हजारांहून अधिक खरेदीदार आणि देशातले पाच हजारांहून अधिक शेतकरी सहभागी होणार आहेत.

कसोटी क्रिकेट

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात दुसरा कसोटी क्रिकेट सामना दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. आज दिवसा अखेर भारताच्या दोन गडी बाद 318 धावा झाल्या आहेत. भारतातर्फे यशस्वी जयस्वालनं सातत्यपूर्ण कामगिरी करत नाबाद 173 धावा काढल्या. तर कर्णधार शुभमन गिल 20 धावांवर खेळत आहे.

युवा महोत्सव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयात युवा महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होत. चार दिवस चाललेल्या या महोत्सवात अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम आणि बुलडाणा जिल्ह्यांतील 195 महाविद्यालयांमधील सुमारे ६ हजार विद्यार्थी सहभागी झाले होते.

हवामान

येत्या काही तासात गोंदिया जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलक्या पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.

******